# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३५३/२०२४ दिनांक २३/०९/२०२४

# प्रेस नोट

## "हड्डी ग्राउंडच्या बाजुला झोपडपट्टीत सोपारा गाव, वाजा मोहल्ला हड्डी मैदान नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघर येथे पाच बांग्लादेशी आरोपी वर कारवाई करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश."

हड्डी ग्राउंडच्या बाजुला झोपडपट्टीत सोपारा गाव वाजा मोहल्ला, इदगा तलावाजवळ हड्डी मैदान नालासोपारा पश्चिम ता. वसई जि. पालघर या परीसरामध्ये परदेशी नागरीक अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेबाबत माहीती अनैतीक मानवी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, व दोन पंच असे सदर ठिकाणी जावुन दि. २२/०९/२०२४ रोजी कारवाई करुन पाच बांग्लादेशींना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी की, सदर परीसरामध्ये अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेले परदेशी नागरीक यांचे मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर ठिकाणी जावुन पाहीले असता काही संशयीत नागरीक मिळून आल्याने त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) अर्षद रहमततुल्ला गाजी वय ५२ वर्षे, २) अलीमोहमद दिनमोहमद मंडल वय ५६ वर्षे, ३) मिराज साहेब मंडल वय १९ वर्षे, ४) साजाद कादीर मंडल वय ४५ वर्षे, ५) साहेब पंचानन सरदार वय ४५ वर्षे सर्व रा. हड्डी ग्राउंडच्या बाजुला झोपडपट्टीत सोपारा गाव वाजा मोहल्ला, इदगा तलावाजवळ हड्डी मैदान नालासोपारा पश्चिम ता. वसई जि. पालघर मुळ रा. बांग्लादेशी, असे सांगितले असुन त्यांचेकडे त्यांचे भारतीय नागरीक असल्याबाबतचे कागदपत्र विचारले असता त्यांनी भारतीय नागरीकत्वांचे कागदपत्र सादर केले नसून ते दहा बारा वर्षापूर्वी बांग्लादेशात बेकारी असल्याने त्यांच्या कुटुंबास सोडून मुंबईला कामानिमित्त बांग्लादेशातुन नदीव्दारे अनधिकृतपणे भारतात आले असता सध्या नालासोपारा या ठिकाणी राहत असुन, सध्या बिगारीचे काम करीत आहेत असे त्यांनी सांगितले आहे.

तरी सदर बांग्लादेशी नागरीकांना ताब्यात घेवून सदर आरोपीतांवर नालासोपारा पोलीस ठाणे गु. रजि. नं. ३३८/२०२४ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९२० चे कलम ३ (अ), ६ (अ), सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप-आयुक्त श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त श्री. मदन बल्लाळ (गुन्हे शाखा), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार तसेच पोहवा/०५०२८ किणी, मपोहवा/०५००४ डोईफोडे, पोहवा/०७०५५ शेटये, चालक पोहवा/०७०६६ पागी, मपोहवा/०८००३ तिवले, मपोशि/१६०९५ पाटील सर्व नेम. अनै. मा. वा. प्र. कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

-----ooo-----